महाराष्ट्रातील सर्व आरोग्य संस्थांमधून रुग्णाना आवश्यक औषध यादीमधील सर्व औषधे मोफत देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन पूरक पत्र, क्रमांक- संकीर्ण २०१३/प्र.क्र. २११/आरोग्य ३
१० वा मजला, संकुल इमारत, जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ७ मे, २०१३.

**वाचा :** १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक- जिरुफी १०.००/प्र.क्र. ९०/२०००/आरोग्य-३, दिनांक १०.७.२००१
२) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे/खरेदी कक्ष/औ.पु./ईडीएल/२०१३, दिनांक २१.४.२०१३.

**शासन पूरक पत्र :** संदर्भाधीन शासन निर्णय, क्रमांक-१ नुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय सुविधांसाठी रुग्णशुल्कासाठी दर निश्चित करण्यात आलेले आहेत. रुग्णालयात दिल्या जाणाऱ्या आवश्यक औषध यादीमधील (Essential drug list) औषधे विनाशुल्क देण्यात यावीत, असे शासनाचे प्रचलित धोरण आहे. तथापि, या धोरणाचा उल्लेख संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक-१ मध्ये नसल्याने काही प्रशासकिय अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. यास्तव संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक-१ अधिक सुस्पष्ट करण्यासाठी राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांना आवश्यक औषध यादीमधील (Essential drug list) औषधे विनाशुल्क पुरविण्यात यावीत असे निर्देश खालील अटींच्या अधिन राहून याद्वारे देण्यात येत आहेत :-

१) आवश्यक औषध यादीतील सर्व औषधे ही राज्य किंवा जिल्हा स्तरावरुन पुरविण्यात येतील. रुग्णांना उपचार देताना फक्त आवश्यक औषध यादीतील (EDL) औषधेच वापरावीत.
२) औषध यादीतील औषधे कमी पडल्यास तसेच क्वचित प्रसंगी यादी बाहेरील औषधे घेण्याचे आवश्यक झाल्यास रुग्ण कल्याण समिती निधी, P.L.A. निधी आणि आरोग्य संस्थांना स्थानिक स्तरावर औषधे घेण्यासाठी वितरीत करण्यात आलेल्या १० टक्के निधीमधून औषधे घ्यावीत. परंतु कोणत्याही परिस्थितीमध्ये रुग्णांना बाहेरुन औषधे लिहून देण्यात येऊ नयेत.
३) सर्व आरोग्य संस्थांमध्ये दर्शनी भागात निळया बॅकग्राऊंडवर पांढऱ्या अक्षरामध्ये **या रुग्णालयात रुग्णांना बाहेरुन औषधे लिहून दिली जात नाहीत** असे **आढळल्यास दुरध्वनी क्र.१०४ वर दुरध्वनी करुन रुग्णाचे नांव, रुग्णालयात आल्याची तारीख व वेळ, बाहेरुन औषध लिहून देणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव (माहिती असल्यास) आणि आरोग्य केंद्राचा पत्ता याची माहिती द्यावी. शक्य असल्यास बाहेरुन लिहून दिलेल्या औषधाचे नाव सांगावे** असा बोर्ड लावण्यात यावा.
४) संचालक, आरोग्य सेवा यांनी बाहेरुन औषधे लिहून देण्याची पध्दती पूर्णपणे बंद करण्यासंदर्भात सर्व जिल्यांची बैठक घेऊन शेवटच्या आरोग्य केंद्रापर्यंत याबाबत माहिती जाईल याची दक्षता घ्यावी.
५) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आणि रुग्णालयांच्या बैठकीत अधिकाऱ्यांनी बाहेरुन औषध लिहून दिल्यास शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल असे सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांना लेखी कळविण्यात यावे व त्याची लेखी पोहोच घ्यावी. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्याची पोहोच घेण्याची

जबाबदारी जिल्हा आरोग्य अधिकारी यांची राहील तर रुग्णालयांचे बाबतीत ही जबाबदारी जिल्हा शल्य चिकित्सक यांची राहील.

६) ही योजना दिनांक २ ऑक्टोबर, २०१३ पासून लागू होईल. म्हणजेच वर्षाची औषधे प्राप्त झाल्यानंतर योजनेस सुरुवात होईल.

७) या योजनेबाबत दिनांक २३.९.२०१३ ते दिनांक १५.१०.२०१३ या कालावधीमध्ये जनजागृती करण्यात यावी. दिनांक २ ऑक्टोबर रोजी जिल्हा स्तरावर याचे उद्‌घाटन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( वि. रा. घडेकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा. राज्यपाल यांचे सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मा. मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
अपर मुख्य सचिव (आरोग्य) यांचे स्वीय सहाय्यक.
सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्वीय सहाय्यक.
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
आयुक्त (कुटुंब कल्याण) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान संचालनालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग.
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व सहसंचालक, आरोग्य सेवा.
सर्व उप संचालक, आरोग्य सेवा.
सर्व जिल्हा शल्य चिकित्सक.
सर्व आरोग्य अधिकारी.
सर्व वैद्यकीय अधिक्षक/ वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालये.
सार्वजनिक आरोग्य विभाग (सर्व कार्यासने)
निवडनस्ती (आरोग्य ३).